# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दुरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : dtedesk2@gmail.com Internet : http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: 2/एनजीसी/मान्यता/2015/ 228
दिनांक : 13 FEB 2015

## अधिसूचना

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेद्वारे [Advt.No.:Approval/०१(०४)/२०१५] एआयसीटीई अॅप्रुव्हल प्रोसेस २०१५-१६ मधील मार्गदर्शक सूचनेच्या आधारे ऑन-लाईन पध्दतीने अर्ज दि. २० फेब्रुवारी, २०१५ पर्यन्त मागविण्यात आलेले आहेत. त्यानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमासंदर्भात परिषदेस केलेल्या अर्जावर शासनाचे अभिप्राय / शिफारस परिषदेस सादर करण्याच्या अनुषंगाने या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता http://www.dtemaharashtra.gov.in/courseapproval2015/ ही लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यासाठी संस्थांनी संचालनालयाने दिलेला संकेतांक व पासवर्ड द्वारे लॉगइन करुन दि. २१.०२.२०१५ पर्यंत माहिती भरून भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करण्यात यावी.

२. विद्यमान पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या व शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये नविन तांत्रिक शिक्षण संस्थेच्या संस्था प्रमुखांच्या निदर्शणास आणण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमांना मान्यता देण्याबाबत शासनाने बृहत् आराखडा [Perspective Plan] तयार केला असून तो संचालनालयाच्या संकेतस्थळी उपलब्ध आहे. तरी परिषदेस प्रस्ताव सादर करतांना बृहत् आराखडयामध्ये शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता उपलब्ध प्रवेशक्षमता विचारात घ्यावयात.

३. विद्यमान पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थामध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ, पीआयओ / एनआरआय च्या जागा, डयुअल डिग्री व इंटीग्रेटेड प्रोग्राम इ. बाबत परिषदेस सादर केलेल्या अर्जाची तपासणी या संचालनालयात सुनावण्या घेऊन करण्यात येणार आहेत. याबाबत ज्या संस्था संचालनालयाच्या संकेतस्थळावर दि. २१.०२.२०१५ पर्यंत ऑन-लाईन पध्दतीने माहिती भरून भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करतील अशा संस्थाची सुनावणी या संचालनालयाच्या समिती सभागृहात खालील प्रमाणे आयोजित करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | विभाग | सुनावणीचा दिनांक | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभाग | दि. २३ .०२.२०१५ रोजी सकाळी १०.३० वाजता | तंत्र शिक्षण संचालनालय, समिती सभागृह, मुख्य कार्यालय, मुंबई |
| २ | मुंबई व पुणे विभाग | दि. २४.०२.२०१५ रोजी सकाळी १०.३० वाजता | |

४. विद्यमान पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थामध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ, पीआयओ / एनआरआय च्या जागा, डयुअल डिग्री व इंटीग्रेटेड प्रोग्राम इ. अर्जाच्या सुनावणीस येतांना खालील कागदपत्रांचे २ संच, तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अर्जात सादर केलेल्या माहितीच्या पृष्ठर्थची

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
1035

दस्तावेज, सन २०१५-१६ च्या अॅप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक मध्ये नमूद केलेल्या मानके व प्रमाणकांच्या पृष्ठ्यर्थ आवश्यक त्या मुळ कागदपत्रासह सुनावणीस प्राचार्यांनी व्यक्तीश: उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

- नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रीडीटेशन, नवी दिल्ली यांनी अॅक्रीडीटेशनास मान्यता दिलेल्या पत्राची साक्षांकीत प्रत
- व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विविध बाबींच्या मान्यतेसाठी शासनाने दि. २१.०८.२०१३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची साक्षांकीत प्रत.
- प्राचार्यांच्या नियुक्तीचे आदेश, नियुक्तीस विद्यापीठाची मान्यता व शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती.
- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या डेफीसिअन्सी रिपोर्ट (Submitted to R.O Office).
- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवर केलेल्या भाग १ व भाग २ च्या अर्जाची [submitted to R.O] साक्षांकीत प्रत.
- ऑन लाईन पध्दतीने संचालनालयाच्या संकेत स्थळी माहिती भरल्यानंतर अॅनेक्सर सी व डी ची साक्षांकीत प्रत.
- जमिन, इमारत, ओसी. इ. बाबत सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत

उपरोक्त नमूद केलेल्या कागदपत्रांचे २ संच (स्पायरल बायडींग स्वरुपात व मुखपृष्ठावर संस्थेचे नांव व डीटीई संकेतांकासह) सुनावणीच्या वेळी या कार्यालयास जमा करण्यात यावा

6. विद्यमान पदवी, पदव्यूत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थेतील सध्या सुरू असलेला अभ्यासक्रम बंद करणे, सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत घट, महिलांसाठीच्या संस्थाचे सर्वसाधारण संस्थेत रुपांतरण व विद्यमान संस्थेच्या नावात बदल इ. बाबत दि. 21.08.2013 च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची साक्षांकीत प्रत, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेली साक्षांकीत दस्तावेज / अॅफीडेव्हीट व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या समावेशनाबाबत तसेच भविष्यात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्यास संस्था सर्वस्वी जबाबदार राहील. या आशयाचे रु.100/- चे नोंदणीकृत लेखी बंधपत्र / हमीपत्रासह स्पायरल बायडींगचे स्वतंत्र 3 संचासह प्रस्ताव विहित कालमर्यादेत या संचालनालयास थेट सादर करण्यात यावा. सदर प्रस्तावांबाबत संचालनालयात सुनावण्या होणार नाही याची संबधित संस्था प्रमूखांनी नोंद घेण्यात यावी.

७. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या नवीन तांत्रिक संस्था / महाविद्यालये सुरू करणे, विद्यमान संस्थांचे नवीन जागेत हस्तांतरण, संस्था बंद करणे इ. बाबत ज्या संस्थानी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस अर्ज / प्रस्ताव सादर केले असतील अशा संस्थांनी दि. २१.०२.२०१५ पर्यंत प्रस्तावाच्या प्रतीसह सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे संपर्क साधावा. याबाबत विभागीय कार्यालयाकडे शासनाने विहित नोंदणी शुल्क भरल्यानंतर पुढील औपचारीक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

पृष्ठांकन क्र.तंशिसं/प्राकाना/शैवि-३/मान्यता/नप्रत/२०१५/ 503
दिनांक : 18 FEB 2015

प्रति,
संचालक/प्राचार्य
सर्व विना अनुदानित पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविकोत्तर पदवी संस्था
नागपूर विभाग, नागपूर.

उपरोक्त पत्रात नमूद केल्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर